**प्रेस नोट** **दिनांक २०/०३/२०१९**

मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांचे संकल्पनेतुन पुणे शहर पोलीसांनी नवीन वर्ष जानेवारी २०१९ पासुन कम्युनिटी पोलिसिंग प्रोजक्ट चालु करण्यात आला आहे सदर प्रोजेक्टमध्ये पोलीसांचे कामामध्ये खाजगी सुरक्ष रक्षकांचा सक्रिय सहभाग वाढविणेचे उददेशाने दिनांक १८/३/२०१९ रोजी सायंकाळी ०४.०० ते ०६.०० चे दरम्यान, आर.एस.पी. शेड, पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर पुणे येथे पुणे पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवर कार्यरत असलेले खाजगी सुरक्षा संस्थांचे मालक, व्यवस्थापक यांची बैठक घेण्यात आली

सदर बैठकीस श्री प्रदिप देशपांडे मा. अपर पोलीस आयुक्त सो गुन्हे, पुणे शहर व श्री. अजित लकडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कम्युनिटी पोलीसिंग, विशेष शाखा, पुणे व पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवर असलेल्या सिक्युरिटी एजन्सीचे मालक, मॅनेजर असे एकुण २०० प्रतिनिधी बैठकीस उपस्थित होते.

सदर बैठकिमध्ये पुणे शहर पोलीसांतर्फे मा. श्री प्रदिप देशपांडे मा. अपर पोलीस आयुक्त सो गुन्हे, पुणे शहर यांनी पुणे शहर पोलीसामार्फत सुरु करण्यात आलेल्या कम्युनिटी पोलीसिंग बाबत माहिती देवून आपण आपले संस्थेमार्फत वेगवेगळया आस्थापनांवर,आयटी पार्क सोसायटया याठीकाणी सुरक्षा रक्षक नेमत असताना त्यांचेकडे सदर ठिकाणी असणारे पोलीस ठाणे फोन नंबर तसेच त्या पोलीस ठाण्यात तपास पथकामध्ये कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचारी यांचे मोबाईल नंबर जवळ ठेवणे आवश्यक आहे तसेच रात्रीचे वेळी कर्तव्यावर असणारे सुरक्षा रक्षक यांचेकडे लाठी व बॅटरी असावी,तसेच आपण स्थानिक पोलीस स्टेशनच्या संपर्कात राहुन आपले संस्थेमध्ये कार्यरत असणारे सुरक्षा रक्षक यांची नावांची यादी स्थानिक पोलीस स्टेशनला दयावी,आपले सुरक्षा रक्षकांचे व्हेरीफीकेशन वेळीच करावे.तसेच पोलीसांशी समन्वये वाढवुन गुन्हे प्रकटीकरण व गुन्हे नियंत्रण या बाबीमध्ये आपला सहभाग दयावा याबाबत मार्गदर्शन केले. तसेच उपस्थितांना मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांचा सदर बैठकी मागील उद्देश समजावून सांगितला व पोलीस कार्यपध्दती बाबत सविस्तर माहिती अवगत करण्यात आलेली आहे.सदर बैठकीचे आभार प्रदर्शन कम्युनिटी पोलीसींगचे समन्वयक अधिकारी पोलीस निरीक्षक श्री अजित लकडे यांनी केले.

Scanned by CamScanner

